छोटी जाहीरातसाठी संपर्क
दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी
आपल्या दैनिकात छोटी जाहीरात प्रकाशित करण्यासाठी hinduprakashvarta@gmail.com या मेल वर आपली जाहीरात पाठवावे, तसेच खालील नंबरवर संपर्क साधावा.
जाहीरात व्यवस्थापक
दैनिक हिंदू प्रकाश वार्ता, संभाजीनगर
Mob. No. : 7261999911

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

वेअर हाऊस, गोडाऊन भाड्याने देणे/घेणे साठी
Chaitali enterprises.leading warehouse leasing company Chhatrapati Sambhaji nagar
संपर्क
www.chaitali enterprises.com वर किंवा मोबाईल नंबर 9226611011 वर साधावा.

छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. ०२ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ४३ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

थोडक्यात वार्ता

मुंबई पोलिसांची कामगिरी, आत्महत्या करणाऱ्या महिलेचे वाचवले प्राण

मुंबई : मुंबई पोलीस नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि मदतीसाठी सदैव तत्पर असल्याचे आणखी एक उदाहरण समोर आले आहे. मरीन ड्राइव्ह परिसरात पोलिसांच्या सतर्कतेमुळे आणि स्थानिक नागरिकांच्या सहकार्यामुळे ४६ वर्षीय महिलेचा जीव वाचवण्यात यश आले. ३१ मे रोजी घडलेल्या या घटनेत संबंधित महिला समुद्रात उतरल्याचे निदर्शनास आले होते. परिस्थितीचे गांभीर्य ओळखत पोलिसांनी क्षणाचाही विलंब न करता बचावकार्य सुरू केले आणि मोठी दुर्घटना टळली. या संपूर्ण घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असून मुंबई पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक केले जात आहे.

लिपिकाने महिला कर्मचारी कडे केली शरीर सुखाची मागणी

सांगली : सांगली विभागीय एसटी महामंडळाच्या कार्यालयात एक धक्कादायक आणि संतापजनक प्रकार घडला आहे.या कार्यालयात काम करणाऱ्या एका वरिष्ठ लिपिकाने महिला कर्मचाऱ्याशी असभ्य वर्तन करून तिच्याकडे शरीर सुखाची मागणी केली होती. सांगलीतील एसटी महामंडळ विभागीय कार्यालयात तोंडाला काळीमा फासणारा एक धक्कादायक आणि संतापजनक प्रकार घडला आहे.या कार्यालयात एक महिला काम करत होती वरिष्ठ लिपिका कडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून अखेर तिने पोलिसात तक्रार केल्या वर सर्व प्रकार उघडीस आला .वरिष्ठ लिपिक महिला कर्मचारीला रोज काम करत असताना विचित्र आणि घाणेरड्या नजरेने पाहात असे सुरुवातीला तिने दुर्लक्षित केलं सर्व सहन करत राहिली परंतु दिवसेंदिवस हा प्रकार वाढू लागला. त्या वरिष्ठ लिपिकाने महिला कर्मचाऱ्याशी असभ्य वर्तन करून तिच्याकडे शरीर सुखाची मागणी केली होती. या संबंधित प्रकरणी महिलेने महामंडळाकडे सविस्तर तक्रार केली होती.पण त्याच्या वर कोणत्याही प्रकारची कारवाई झाली नाही म्हणून महिला कर्मचारीचा राग अनावर झाला आणि तिने वरिष्ठ लिपिका ला चांगलाच चोप दिला.

राज्यातील 23 जिल्ह्यांना हायअलर्ट

मुंबई : पुढील २ दिवसांमध्ये केरळसह तमिळनाडूमध्ये मान्सून धडक मारण्याची शक्यता आहे. तर राज्यात पावसाला पोषक वातावरण असून आज ६ जिल्ह्यांमध्ये गारपीटीचा अंदाज आहे. तर पुढील ५ दिवस काही भागात वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. राज्यात मान्सूनपूर्व पावसाची सक्रियता वाढताना दिसत असून २ जून रोजी राज्यातील तब्बल २३ जिल्ह्यांना हवामान विभागाकडून यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. कोकणातील ५ , उत्तर महाराष्ट्रातील ४, पश्चिम महाराष्ट्रातील २, मराठवाड्यातील ४ आणि विदर्भातील ८ जिल्ह्यांना हा अलर्ट देण्यात आला असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

राज्यसभा आणि राज्य विधान परिषदाच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर

नवी दिल्ली : भारतीय निवडणूक आयोगाने (ECI) तीन राज्यांतील विधान परिषदांच्या (आमदारांतर्फे होणाऱ्या) द्वैवार्षिक पक्षीय आणि पोटनिवडणुकांसह राज्यसभेच्या २७ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. देशातील दहा राज्यांतील २४ राज्यसभा जागांसाठी द्वैवार्षिक निवडणूक होणार असून महाराष्ट्र, तमिळनाडू आणि ओडिशा येथे प्रत्येकी एका राज्यसभेच्या जागेसाठी पोटनिवडणूक घेतली जाणार आहे.

निवडणूक कार्यक्रम : अर्ज भरण्याचा अंतिम दिवस ८ जून २०२६, दुपारी ३ पर्यंत, अर्जांची छाननी ९ जून २०२६, अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिवस ११ जून २०२६, निवडणुका झाल्या तर मतदान १८ जून २०२६, दुपारी ४ पर्यंत, मतमोजणी १८ जून २०२६ रोजी संध्याकाळी ५ नंतर.

माणुसकीला काळीमा : पोटच्या निष्पाप 5 वर्षीय चिमुरड्यावर पित्याकडूनच अत्याचार

नराधम बापाचे घृणास्पद कृत्य; आईला सांगण्याची धमकी देत बालकाला ठेवले दहशतीखाली, शिवसैनिकांच्या मदतीने पोलिसांत गुन्हा दाखल

मुंबई : शहरातून एक अत्यंत संतापजनक आणि माणुसकीला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. सातारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका नराधम पित्याने आपल्याच अवघ्या पाच वर्षांच्या निष्पाप चिमुरड्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या विकृत कृत्यामुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी पीडित बालकाच्या बत्तीस वर्षीय मातेने दिलेल्या तक्रारीवरून सातारा पोलिसांनी नराधम पित्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पोलीस पुढील कायदेशीर कारवाई करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, हे पीडित कुटुंब मूळचे परभणी जिल्ह्यातील रहिवासी असून सध्या छत्रपती संभाजीनगर येथील एका गृहप्रकल्पात वास्तव्यास आहे. घरात कोणीही नसताना वेगवेगळ्या वेळी आरोपी पित्याने निष्पाप बालकाला आपल्या वासनेचा बळी बनवलं. इतकेच नव्हे तर, हे कृत्य जर कोणाला सांगितलं किंवा आईला माहिती दिली, तर इमारतीच्या गच्चीवरून खाली फेकून देण्याची क्रूर धमकीही या नराधमाने चिमुरड्याला दिली होती. या भीतीमुळे बालक प्रचंड दहशतीखाली होते. या सततच्या अत्याचारामुळे बालकाच्या मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम झाला होता.

अलीकडेच बालकाच्या वाढदिवसानिमित्त घरात आनंदाचे वातावरण असताना, तो अचानक अत्यंत गंभीर आणि अबोल झाला. मुलाची ही बदललेली वर्तणूक पाहून आईला संशय आला. तिने अत्यंत विश्वासाने मुलाला जवळ घेऊन चौकशी केली असता, चिमुरड्याने त्याच्यासोबत घडलेला अंगावर काटा आणणारा सर्व प्रकार रडत रडत सांगितला. पोटच्या मुलावर स्वतःच्या पतीनेच असा अत्याचार केल्याचे ऐकून मातेला प्रचंड धक्का बसला. त्यानंतर महिलेने शिवसैनिकांच्या मदतीने पोलीस ठाणे गाठून पोलिसांना हकीकत सांगितली आणि गुन्हा दाखल केला. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

पुणे दुर्घटनेनंतर उत्पादन शुल्क विभागाचा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात धडाका

24 तासांत 51 गुन्हे; 50 आरोपी जेरबंद, अवैध दारू माफियांमध्ये खळबळ

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर, दि. १ : पुणे येथे घडलेल्या अलीकडील गंभीर घटनेनंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाने संपूर्ण राज्यात अवैध दारूविरोधात आक्रमक भूमिका घेतली असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अवघ्या २४ तासांत धडक कारवाईची मालिका राबवून अवैध मद्य व्यवसाय करणाऱ्यांवर मोठा प्रहार केला आहे. आयुक्तांच्या थेट आदेशानुसार विशेष पथके रस्त्यावर उतरली असून शहरासह ग्रामीण भागात एकाचवेळी टाकलेल्या छाप्यांमुळे अवैध दारूच्या अड्ड्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

या विशेष मोहिमेत विभागाने तब्बल ५१ गुन्हे दाखल करत ५० आरोपींना अटक केली. एका फरार आरोपीचा शोध सुरू असून कारवाईची व्याप्ती आणखी वाढविण्यात येत आहे. अवैध दारू निर्मिती, साठवणूक, वाहतूक आणि विक्री करणाऱ्या साखळीवर थेट प्रहार करत विभागाने मोठ्या प्रमाणावर मद्यसाठा व रसायने जप्त केली.

कारवाईचा लेखाजोखा

- ५१ गुन्हे दाखल
- ५० आरोपी अटकेत
- १ आरोपी फरार
- १५९.७६ बॉक्स लिटर देशी दारू जप्त
- ३८४ लिटर हातभट्टी व गावठी दारू जप्त
- ४५ लिटर ताडी जप्त
- ३,०७० लिटर रसायन नष्ट
- ₹३.८५ लाखांचा मुद्देमाल जप्त
- ₹९० हजारांची दुचाकी जप्त

कारवाईदरम्यान १५९.७६ बॉक्स लिटर देशी दारू, ३८४ लिटर हातभट्टी

-> पान 2 वर

नीट पेपरफुटी प्रकरण: मुख्य आरोपीच्या अनधिकृत इमारतीवर कारवाई

बीड, 01 जून : देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणात मोठी कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी, सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी याच्या बीडमधील शाहू नगर परिसरातील चार मजली अनधिकृत इमारतीवर प्रशासनाने कारवाई सुरू केली आहे. बीड नगरपालिकेने दिलेली नोटीस आणि अल्टिमेटम संपल्यानंतर संबंधित ठेकेदाराने स्वतःहून हे अवैध बांधकाम पाडण्यास सुरुवात केली आहे.

सीबीआयकडून या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, लातूर आणि बीड येथून अनेकांना अटक करण्यात आली आहे. अटकेनंतर काही आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

तपासादरम्यान धक्कादायक माहिती समोर आली असून लातूरमधील RCC क्लासेसचे प्रा. शिवराज मोटेगावकर आणि पी. व्ही. कुलकर्णी यांचे संगनमत उघड झाले आहे. लातूरमधील एका बालरोगतज्ज्ञांच्या फ्लॅटमध्ये कुलकर्णी क्लासेस चालवत असल्याचेही समोर आले आहे. याशिवाय, मोटेगावकर क्लासेसमध्ये 'प्लॅटिनम गोल्ड बॅच'च्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणात शुल्क आकारले जात असल्याचा आरोप आहे. तपास यंत्रणांना मिळालेल्या माहितीनुसार, कुलकर्णींचे पुण्यातील एका ब्युटी पार्लर चालवणाऱ्या मनीषा वाघमारेशीही संपर्क असल्याचे स्पष्ट झाले आहे. सीबीआय सध्या कुलकर्णी, मोटेगावकर आणि संबंधित व्यक्तींमधील कथित नेटवर्कचा सखोल तपास करत असून या प्रकरणात आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मृत मराठा आंदोलकांच्या वारसांना आता एमआयडीसीत नोकरी

मुंबई : मराठा आरक्षणासाठी झालेल्या आंदोलनादरम्यान मृत्युमुखी पडलेल्या आंदोलकांच्या कुटुंबांना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. या आंदोलनातील मृतांच्या पात्र वारसांना आता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळात (एमआयडीसी) नोकरी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. या अनुषंगाने प्रक्रियेला गती देत, राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आपापल्या जिल्ह्यातील मृत आंदोलकांच्या वारसांची तातडीने कायदेशीर पडताळणी करून त्यांना प्रमाणपत्रे वितरित करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत.यापूर्वी, मराठा आरक्षणाच्या आंदोलनातील मृतांच्या वारसांना राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याची तरतूद करण्यात आली होती. याच धर्तीवर आता 'एमआयडीसी'मध्येही मृत आंदोलकांच्या एका वारसाला अनुकंपा तत्त्वावर सेवेत सामावून घेतले जाईल. राज्य सरकारच्या वतीने मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी काही दिवसांपूर्वीच मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांना यासंदर्भात आश्वासन दिले होते. या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी आता प्रशासकीय पातळीवर वेगवान हालचाली सुरू झाल्या असून सामान्य प्रशासन विभागाने (जीएडी) या संदर्भातील विशेष परिपत्रक सर्व जिल्हाधिकाऱ्यांना जारी केले आहे.

सामान्य प्रशासन विभागाने काढलेल्या आदेशानुसार, एमआयडीसीत अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्यासाठी मृत आंदोलकांच्या वारसांची पडताळणी अत्यंत काटेकोर आणि अचूक असणे आवश्यक आहे.

हिंदू प्रकाश वार्ताच्या वृत्तानंतर प्रशासन खडबडून जागे; पीडब्ल्यूडीत 'वेळेची शिस्त' चर्चेत

उशिरा हजेरीच्या वृत्ताची दखल • कर्मचाऱ्यांना सूचना • लवकरच बायोमेट्रिक प्रणाली कार्यान्वित होणार

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्ल्यूडी) कार्यालयांतील कर्मचाऱ्यांच्या उशिरा उपस्थितीबाबत प्रसिद्ध झालेल्या वृत्ताची अखेर विभाग प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. कार्यालय सुरू होऊनही कर्मचारी वेळेत उपस्थित राहत नसल्याचे वास्तव समोर आल्यानंतर कार्यकारी अभियंता शेषराव चव्हाण यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात आल्याचे स्पष्ट केले. तसेच काही तांत्रिक कारणांमुळे रखडलेली बायोमेट्रिक हजेरी प्रणाली येत्या काही दिवसांत कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

वृत्ताचा प्रभाव; शिस्तीच्या दिशेने पहिले पाऊल

पीडब्ल्यूडी कार्यालयांतील रिकामे टेबल, उशिरा येणारे कर्मचारी आणि बायोमेट्रिक प्रणालीच्या अभावामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासाबाबतचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर विभाग प्रशासनाने तत्काळ दखल घेतली आहे. कार्यकारी अभियंता शेषराव चव्हाण यांनी कर्मचाऱ्यांना वेळेचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना दिल्याचे सांगितले असून लवकरच बायोमेट्रिक हजेरी प्रणाली कार्यान्वित करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे आता प्रत्यक्षात कार्यालयीन शिस्तीत सुधारणा होते का आणि कर्मचाऱ्यांच्या वेळपालनावर कितपत नियंत्रण येते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

पीडब्ल्यूडीच्या विविध कार्यालयांमध्ये कर्मचारी वेळेत उपस्थित राहत नसल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर विभागात हालचाली सुरू झाल्या आहेत. या संदर्भात प्रतिक्रिया देताना कार्यकारी अभियंता शेषराव चव्हाण म्हणाले, "काही तांत्रिक कारणांमुळे अद्याप बायोमेट्रिक हजेरी प्रणाली बसविण्यात आलेली नाही. मात्र ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून येत्या काही दिवसांत ती कार्यान्वित केली जाईल."

ते पुढे म्हणाले, "कार्यालयीन वेळेचे पालन करणे प्रत्येक कर्मचाऱ्याची जबाबदारी आहे.

-> पान 2 वर

सुहास शिरसाठ यांचा विधान परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाचे उमेदवार सुहास शिरसाठ यांनी सोमवारी राज्याचे मंत्रिमंडळातील मंत्री अतुल सावे यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक अधिकाऱ्यांकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

यावेळी भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचे संपूर्ण नियोजन केले. महायुतीतील सर्व पक्षांचे नेते, नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, नगरपरिषद सदस्य तसेच पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महायुतीच्या सर्व नेत्यांनी एकत्र येत सुहास शिरसाठ यांच्या उमेदवारीला पाठिंबा दर्शविला.

आगामी निवडणुकीत महायुतीचा विजय निश्चित असल्याचा विश्वास व्यक्त करत कार्यकर्त्यांनी उत्साहपूर्ण वातावरणात उमेदवारी अर्ज दाखल केला.

महायुतीचे शक्तिप्रदर्शन

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या वेळी महायुतीतील सर्व घटक पक्षांचे नेते, लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी एकत्र आल्याने महायुतीची एकजूट दिसून आली. नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य आणि नगरपरिषद सदस्यांच्या उपस्थितीमुळे हा कार्यक्रम शक्तिप्रदर्शन ठरला. सुहास शिरसाठ यांच्या उमेदवारीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

फसव्या जाहिराती करणाऱ्या सेलिब्रिटींवरही कारवाई; तुकाराम मुंढेंचा इशारा

मुंबई : राज्यातील धडाकेबाजी सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध विभागाचा पदभार स्वीकारल्यापासूनच कारवाईचा धडाका सुरू केला आहे. दोनच दिवसांत अन्न व औषध प्रशासनाचा चार्ज स्वीकारल्यानंतर आयुक्त तुकाराम मुंढे चांगलेच ॲक्शन मोडमध्ये आले असून अवैध गुटखा, भेसळयुक्त पदार्थांच्या दुकानांवर कारवाई केल्यानंतर आता पुढील अध्याय सुरू केल्याचं दिसून येतं. आत्तापर्यंत 28 दुकाने सील करण्यात आली असून 33 आरोपींना अटकही करण्यात आल्याची माहिती आहे. आता, तुकाराम मुंढेंनी टीव्ही आणि पेपरात मिसलीडिंग ॲडव्हर्टायझिंग करणाऱ्या सेलिब्रिटींवर कारवाई करण्याचा बडगा उगरला आहे. ब्रँड आणि मोठमोठी आश्वासने देत, फायदे दाखवत कंपन्यांकडून अनेकदा ग्राहकांची फसवणूक केली जाते. चुकीच्या आणि मिसलिडिंग जाहिराती दाखवून ग्राहकांना उत्पादन घेण्यास भाग पाडले जाते. मात्र, आता मिसलीडिंग ॲडव्हर्टायझिंग करणाऱ्यांवर कडक कारवाईचा इशारा तुकाराम मुंढे यांच्या अन्न व औषध प्रशासन विभागाकडून देण्यात आला आहे.

भाजपाने ठाकरेंच्या शिवसेनेचे हातपाय तोडले, आमचे तर मुंडकेच छाटले : आ. अब्दुल सत्तार

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : विधान परिषदेच्या छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज संस्था मतदारसंघात महायुतीमधील अंतर्गत धुसफूस आता पूर्णपणे चव्हाट्यावर आली आहे. शिंदे गटाचे मंत्री आ. अब्दुल सत्तार यांनी थेट बंडखोरीचे निशाण फडकावले असून, त्यांचे सुपुत्र समीर सत्तार यांनी निवडणुकीच्या रिंगणात शड्डू ठोकला आहे. भाजपचे अधिकृत उमेदवार सुहास शिरसाट यांच्यासमोर आता समीर सत्तार यांनी तगडे आव्हान उभे केल्याने महायुतीमधील बिघाडी उघडी पडली आहे. या घडामोडीनंतर आ. सत्तार यांनी भाजपवर अत्यंत धारदार शब्दांत टीकास्त्र सोडले आहे. "भाजपने ठाकरेंच्या शिवसेनेचे फक्त हात-पाय तोडले; पण आमचे तर थेट मुंडकेच तोडले आहे!" असा घणाघाती आरोप सत्तार यांनी केला आहे.

जागावाटपाची हुकूमशाही आणि सत्तारांचा 'पॅटर्न'!

छत्रपती संभाजीनगरची ही जागा महायुतीत नेमकी कोणाकडे जाणार, यावरून गेल्या अनेक दिवसांपासून रस्सीखेच सुरू होती. मात्र, वाटाघाटीत ही जागा भाजपने आपल्याकडे खेचून घेतली आणि सुहास शिरसाट यांची उमेदवारी जाहीर करून टाकली.

वरिष्ठांच्या दबावापुढे झुकून आ. सत्तार यांचे सुपुत्र माघार घेतील, अशी अटकळ राजकीय वर्तुळात बांधली जात होती. मात्र, आजवरच्या आपल्या आक्रमक आणि अनपेक्षित राजकारणासाठी प्रसिद्ध असलेल्या अब्दुल सत्तार यांनी 'माघार नाही, तर थेट लढाई' हाच पवित्रा कायम ठेवला. समीर सत्तार यांनी उमेदवारी अर्ज मागे न घेता कायम ठेवल्यामुळे भाजपच्या गोटात कमालीची अस्वस्थता पसरली आहे. सत्तार यांच्या या भूमिकेमुळे आता या मतदारसंघातील राजकीय गणितं पूर्णपणे उलथून पडली असून, येथे आता तिरंगी आणि अटीतटीची लढत पाहायला मिळणार आहे.

भाजप: सुहास शिरसाट (अधिकृत महायुती उमेदवार)

शिंदे गट (बंडखोर): समीर सत्तार (भाजपच्या सत्तेला घरातूनच दिलेले आव्हान)

महाविकास आघाडी: देवयानी पाटील डोणगावकर (मैदानात असलेल्या मुख्य उमेदवार)

भाजपच्या उमेदवाराला मित्रपक्षाकडूनच झालेल्या या मोठ्या बंडखोरीचा मोठा फटका बसणार हे आता स्पष्ट झाले आहे. आता अब्दुल सत्तार हे आपल्या रणनीतीने विजयाचे गणित कसे जुळवून आणतात आणि भाजप या बंडखोरीला कसं तोंड देतो, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे डोळे लागले आहेत. महायुतीमधील हा अंतर्गत कलह आता निवडणुकीत कोणाला फायद्याचा ठरणार, हे पाहणे रंजक ठरेल.

'मोठा भाऊच संपवायला निघाल्यावर इलाज काय?'

पत्रकारांशी बोलताना आ. अब्दुल सत्तार यांचा संताप अनावर झाला होता. महायुतीमधील अंतर्गत गळचेपीवर बोट ठेवत ते म्हणाले:

"त्यांनी ठाकरेंच्या शिवसेनेचे तर फक्त हातपायच तोडले, पण आमचे तर मुंडकेच छाटून टाकले! तुम्ही उघड्या डोळ्यांनी बघा, आपली अनेक वर्षे सत्ता असलेली जिल्हा परिषद गेली. महापालिकेत स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या काळापासून आपली सत्ता डौलाने उभी होती, पण आता आपल्या हातात काय राहिले? माझा कोणाला वैयक्तिक विरोध नाहीये. पण जर आमचा 'मोठा भाऊ' (भाजप) आम्हालाच संपवायला निघणार असेल, तर त्याला आता आमच्याकडे दुसरा कोणताही इलाज उरलेला नाही!"

असे म्हणत सत्तार यांनी भाजपविरोधात थेट रणशिंगच फुंकले आहे. दरम्यान, शिवसेनेचे दोन्ही गट आता एकत्र आले पाहिजेत, असे मत ठाकरे गटाचे अंबादास दानवे यांनी व्यक्त केले होते. यावर बोलताना सत्तार यांनी सावध पवित्रा घेतला. "मुख्यमंत्री एकनाथ शिंदे जो निर्णय घेतील, तो मला अंतिम आणि मान्य असेल," असे ते म्हणाले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

जनारोग्याशी खेळणाऱ्यांना दणका आणि प्रशासकीय धडाका

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर विभागातील यंत्रणा पूर्णपणे सक्रिय झाली असून, जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कंपन्या आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई सुरू झाली आहे. राज्यातील सात जिल्ह्यांमधील बारा आयुर्वेदिक औषध विक्री आस्थापनांवर धडक कारवाई करत लाखो रुपयांचा संशयास्पद औषध साठा जप्त करण्यात आला आहे. भ्रामक आणि दिशाभूल करणाऱ्या जाहिराती असलेल्या मिसब्रँडेड औषधांवर ही मोहीम राबवण्यात आली असून, संबंधितांविरुद्ध कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. आयुक्तांनी पदभार स्वीकारल्यापासून अन्न व औषध प्रशासन विभागात नव्या ऊर्जेने काम सुरू झाले असून राज्यभरात आक्षेपार्ह जाहिराती आणि अवैध औषध साठ्यावर नजर ठेवण्यासाठी विशेष मोहिमा राबवल्या जात आहेत. नागपूर विभागातील ही यशस्वी कारवाई ही केवळ एक सुरुवात असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. या धडक मोहीमेत एफडीए अधिकाऱ्यांनी नागपूर जिल्ह्यातील येरला येथे एका पॅकिंग युनिटवर छापा टाकला. या कारवाईत पतंजली समूहाशी संबंधित दिव्य फार्मसीने तयार केलेल्या औषधांचा मोठा साठा जप्त करण्यात आला. या औषधांची एकूण किंमत लाखो रुपयांपेक्षा अधिक आहे. ही कारवाई सहआयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली गेली. जप्त करण्यात आलेल्या औषधांमध्ये न्यूरोग्रिट गोल्ड, मेमोरीग्रीट, मधुग्रिट, मेलानोग्रिट, सिस्टोग्रिट आणि नारीकांची यांचा प्रामुख्याने समावेश आहे. या औषधांच्या पॅकेजिंग आणि जाहिरातींमध्ये मधुमेह, स्थूलपणा, त्वचारोग तसेच इतर गंभीर आजारांवर पूर्ण उपचार होत असल्याचे भ्रामक दावे करण्यात आले होते. अशा प्रकारच्या दिशाभूल करणाऱ्या आक्षेपार्ह मजकुरामुळे एफडीएने ही तातडीची आणि मोठी कारवाई केली. जनतेच्या आरोग्याशी संबंधित कोणत्याही प्रकारची फसवणूक सहन केली जाणार नाही, अशी रोखठोक भूमिका प्रशासनाने घेतली आहे. भ्रामक जाहिराती प्रसिद्ध करणे, अवैध उत्पादन आणि विक्री याविरुद्धची कारवाई यापुढे अधिकाधिक कठोर आणि सातत्यपूर्ण राहील, असा सज्जड दमही दिला गेला आहे. या प्रकारच्या गैरप्रकारांमध्ये गुंतलेल्या कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला प्रशासनाकडून कोणतीही सूट दिली जाणार नाही, असा इशारा देण्यात आला आहे. ग्राहकांनी किंवा जनतेने कोणत्याही औषधांच्या जाहिरातींमधील अतिशयोक्तीपूर्ण दाव्यांवर अजिबात विश्वास ठेवू नये आणि संशयास्पद उत्पादने वापरण्यापूर्वी अधिकृत वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन एफडीएने केले आहे. भ्रामक जाहिरातींमुळे जनआरोग्याला मोठा धोका निर्माण होऊ शकतो, त्यामुळे अशा फसव्या कंपन्यांचे कंबरडे मोडणे ही काळाची गरज बनली आहे.

जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर जीवन विम्याची गरज कशी बदलत जाते? : केदार पत्की, सीएफओ

योग्य हेतू असूनही जीवन विमा हा अजूनही अनेकांसाठी टाळला जाणारा किंवा सर्वाधिक दुर्लक्षित आर्थिक गरजांपैकी एक आहे. याचा प्रत्यय दरवर्षी सरकारी संस्थांकडून जाहीर होणाऱ्या विमा घनता (Insurance Density) आणि विमा प्रवेश (Insurance Penetration) आकडेवारीतून स्पष्टपणे येतो.

भारत ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनण्याच्या महत्त्वाकांक्षेकडे वेगाने वाटचाल करत असताना, एक महत्त्वाचा पाया अजूनही कमकुवत आहे — नागरिकांची आर्थिक सुरक्षितता. झपाट्याने आर्थिक प्रगती होत असली तरी, जीवनातील अनिश्चित प्रसंगांपासून व्यक्ती आणि कुटुंबांचे संरक्षण करणारी सक्षम सामाजिक सुरक्षा व्यवस्था देशात अजूनही पुरेशी विकसित झालेली नाही. भारताला खऱ्या अर्थाने आर्थिक महासत्ता बनायचे असेल, तर विकासाबरोबर आर्थिक सुरक्षितताही तितकीच आवश्यक आहे. जीवन विमा हा या सुरक्षाकवचाची महत्त्वाची भूमिका निभावू शकतो — मात्र त्यासाठी प्रत्येक भारतीयाने आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर त्याचे महत्त्व ओळखणे गरजेचे आहे.

आजही भारतात विमा संरक्षणाचा अभाव मोठ्या प्रमाणावर आहे. ८० टक्क्यांहून अधिक कुटुंबांकडे जीवन विमा संरक्षण नाही. IRDAI च्या २०२४-२५ वार्षिक अहवालानुसार, विमा उद्योगाने ₹८.८६ लाख कोटींचे प्रीमियम उत्पन्न नोंदवत ६.७३ टक्के वाढ साधली असली तरी, प्रत्यक्ष नवीन विमा खरेदीचे प्रमाणे सुमारे २.७ टक्क्यांपर्यंत घसरले आहे. हे आकडे संरक्षण आणि विम्याचे प्रत्यक्ष खरेदीचे प्रमाण यांतील मोठी दरी दर्शवतात. यामागचे एक प्रमुख कारण म्हणजे "विशिष्ट जीवन टप्प्यावर पोहोचल्यानंतरच जीवन विमा आवश्यक असतो" ही सर्वसाधारण धारणा. प्रत्यक्षात मात्र, जीवन विमा प्रत्येक वयात आणि जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर वेगवेगळ्या प्रकारचे फायदे देतो.

उत्साही विशी – तरुण वयात घेतलेला विमा अधिक फायदेशीर

करिअरच्या सुरुवातीच्या टप्प्यातील अनेक तरुण व्यावसायिक जीवन विम्याला प्राधान्य देत नाहीत. त्यांना वाटते की त्यांच्यावर फारशा जबाबदाऱ्या नाहीत किंवा आश्रितही नाहीत. पण प्रत्यक्षात, कमी वयात जीवन विमा घेतल्यास दीर्घकालीन संरक्षण अत्यंत कमी प्रीमियममध्ये मिळवण्याची संधी मिळते. साधारणपणे तरुण वयात आरोग्य अधिक चांगले असते, त्यामुळे जोखीम कमी आणि प्रीमियमही स्वस्त असतो. लवकर विमा घेतल्यास आयुष्यभरासाठी कमी प्रीमियम निश्चित करून ठेवता येतो. नंतर जबाबदाऱ्या आणि जीवनातील बांधिलकी वाढत गेल्यावर कव्हरही वाढवता येते. विशेषतः शहरी जीवनात राहणीमान, निवास, जीवनशैली आणि इतर खर्च वयानुसार वाढत जातात. त्यामुळे कमी दरात जीवन विमा लवकर निश्चित करणे अधिक शहाणपणाचे ठरते. यामुळे मोठ्या प्रमाणावर खर्चात बचत होते आणि सातत्यपूर्ण आर्थिक संरक्षणही मिळते.

स्थिर्ये देणारी तिशी – कुटुंबासाठी आर्थिक संरक्षण उभे करण्याची वेळ

तिशीत प्रवेश करताना जीवनात अनेक जबाबदाऱ्या वाढू लागतात — विवाह, घर खरेदी आणि पालकत्व यामुळे खर्चाचे स्वरूप बदलते. या टप्प्यावर जीवन विमा हा केवळ संरक्षण नव्हे, तर दीर्घकालीन आर्थिक नियोजनाचे प्रभावी साधन ठरू शकतो. तो कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेसह भविष्यातील संपत्ती निर्मितीलाही मदत करतो. पण वास्तव असे आहे की या वयात अनेक कुटुंबांवर आर्थिक ताण असतो. आरोग्यसेवेचा वाढता खर्च आणि जीवनशैलीशी संबंधित वाढते धोके लक्षात घेता, विमा संरक्षण वाढवणे, गंभीर आजारांचे (क्रिटीकल इलनेस) कव्हर घेणे आणि बदलत्या जीवन उद्दिष्टांनुसार विमा पोर्टफोलिओचा नियमित आढावा घेणे अत्यावश्यक ठरते.

जबाबदाऱ्यांनी भरलेली चाळीशी – अधिक व्यापक संरक्षणाची गरज

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या २०२५ च्या सर्वेक्षणानुसार, २५.६ टक्के लोकांनी हृदयविकारासारख्या आजारांची नोंद केली, तर जुलै २०१७ ते जून २०१८ या कालावधीत हे प्रमाण १६.७ टक्के होते. या सर्वेक्षणातून असेही स्पष्ट झाले की ४५ वर्षांवरील लोकांमध्ये जीवनशैलीजन्य आजार अधिक प्रमाणात आढळतात. त्यामुळे चाळिशीत करिअर सर्वोच्च टप्प्यावर असले तरी आरोग्याशी संबंधित धोकेही वाढतात. याच काळात मुलांच्या शिक्षणाचा खर्च, विशिष्ट जीवनशैली टिकवणे आणि वृद्ध आई-वडिलांची जबाबदारी अशा अनेक आर्थिक जबाबदाऱ्या शिगेला पोहोचतात. त्याचबरोबर निवृत्ती नियोजनाकडेही लक्ष द्यावे लागते. म्हणूनच चाळीशी हा संपूर्ण आर्थिक नियोजन आणि संरक्षण व्यवस्थेचा फेरआढावा घेण्याचा टप्पा आहे. या वयात जीवन विमा गुंतवणुकीत विविधता आणणे आवश्यक असते. टर्म प्लॅनसोबत ॲन्युइटी आधारित पेन्शन योजना आणि बचतप्रधान मनी-बॅक योजना यांचाही विचार करणे गरजेचे ठरते, जेणेकरून भविष्यातील सर्व अनिश्चित परिस्थितींना तोंड देता येईल.

धोरणात्मक पन्नाशी – निवृत्ती आणि वारशाची तयारी

या टप्प्यावर आपण सक्रिय उत्पन्नाच्या आयुष्याच्या शेवटाकडे पोहोचत असतो. त्यामुळे केवळ संपत्ती साठवण्यापुरते गुंतवणूक धोरण मर्यादित ठेवणे परवडणारे नसते. निवृत्तीनंतर नियमित आणि अंदाजे उत्पन्न मिळणे अत्यावश्यक असते. तसेच, छंद जोपासणे किंवा परदेश प्रवासासारखी स्वप्ने पूर्ण करण्यासाठी आर्थिक स्वातंत्र्यही आवश्यक असते. निवृत्ती निधीचे सक्रिय व्यवस्थापन करण्याची तयारी आणि क्षमता किती आहे यानुसार त्वरित ॲन्युइटी योजना निवडता येतात आणि उर्वरित निधी इतर आर्थिक साधनांत वाढीसाठी गुंतवता येतो. सिंगल आणि लिमिटेड प्रीमियम पॉलिसी, उदाहरणार्थ हमी उत्पन्न योजना, तसेच टर्म प्लॅन यांचे संयोजन आर्थिक सुरक्षिततेसाठी आदर्श ठरू शकते.

कटू सत्य

परंपरागत शहाणपण आपल्याला कुटुंबाची सुरक्षितता, भविष्यातील उद्दिष्टे, निवृत्तीचे आयुष्य आणि वारसा यांचे संरक्षण करण्याचे मार्ग शोधायला सांगते. पण प्रत्यक्षात आपण "आज आणि आत्ता" यापलीकडे फारसा विचार करत नाही आणि आपल्या जिव्हाळ्याच्या गोष्टींचे रक्षण करण्यासाठी आवश्यक ती सोपी पावले उचलत नाही. पण इंग्रजीत म्हणतात तसे, इट इज नेव्हर टू लेट. पर्याय अनेक असू शकतात, पण त्यातील योग्य पर्याय निवडून त्यावर कृती करणे हेच महत्त्वाचे आहे. जीवन विमा हा उत्पन्न, जबाबदाऱ्या आणि जीवनाच्या विविध टप्प्यांनुसार बदलत जाणारा एक गतिमान आर्थिक साधन आहे. योग्य वेळी आणि योग्य टप्प्यावर जीवन विम्यात गुंतवणूक केल्यास संपूर्ण आर्थिक स्थैर्य आणि सुरक्षितता अधिक प्रभावीपणे साधता येते. शेवटी, हे असे दीर्घकालीन आर्थिक साधन आहे ज्यात सेवा पुरवणाऱ्याकडे माघार घेण्याचा पर्याय नसतो.

कृषी पुरस्कारांसाठी ऑनलाईन अर्ज प्रणाली सुरू; शेतकऱ्यांना घरबसल्या अर्जाची सुविधा

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : राज्यातील विविध कृषी पुरस्कारांसाठी अर्ज प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेळबद्ध करण्यासाठी कृषी विभागाने ऑनलाईन संगणकीय प्रणाली सुरू केली आहे. आता शेतकऱ्यांना पारंपरिक ऑफलाईन पद्धतीऐवजी कृषी विभागाच्या https://krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील 'कृषी पुरस्कार' टॅबमध्ये जाऊन घरबसल्या ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि खर्च दोन्ही वाचणार असून शेती व पूरक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या इच्छुक शेतकरी, व्यक्ती, संस्था आणि गटांनी सन २०२५ पासूनच्या विविध कृषी पुरस्कारांसाठी संगणक प्रणालीद्वारे तात्काळ ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक सुनिल वानखेडे यांनी केले आहे.

यापूर्वी कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन स्वरूपात सादर करावे लागत होते. त्यामुळे प्रस्ताव तयार करण्यासाठी खर्च येत असल्याने अनेक इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. तसेच प्रस्ताव सादरीकरण, पडताळणी आणि संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रक्रिया अधिक सुलभ व प्रभावी करण्यासाठी कृषी विभागाने स्वतंत्र ऑनलाईन प्रणाली विकसित केली आहे.

या संगणकीय प्रणालीद्वारे पुरस्कारांसाठी प्रस्ताव सादर करणे, तपासणी, मूल्यांकन आणि अहवाल निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया डिजिटल पद्धतीने राबविणे शक्य होणार आहे. त्यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता वाढणार असून पुरस्कार प्रक्रियेची कार्यक्षमता, विश्वासार्हता आणि परिणामकारकता अधिक बळकट होणार आहे.

ऑनलाईन प्रणालीमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या अर्ज सादर करता येणार आहे. तसेच ऑफलाईन चार प्रतींमध्ये प्रस्ताव तयार करण्यासाठी लागणारा वेळ व खर्च वाचणार आहे. एकदाच अपलोड केलेली कागदपत्रे पुन्हा सादर करण्याची गरज भासणार नाही. अर्ज कोणत्या टप्प्यावर आहे याची माहितीही शेतकऱ्यांना सहज मिळू शकणार आहे. छपाई, झेरॉक्स, प्रवास आणि पोस्टाचा खर्च कमी होऊन आर्थिक भारही कमी होणार आहे.

महाराष्ट्र राज्य हे कृषी उत्पादन आणि कृषी उद्योग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यात दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, व्यक्ती, संस्था आणि गटांना डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार राज्यपालांच्या हस्ते प्रदान करण्यात येतो.

24 तासांत 51 गुन्हे; 50 आरोपी जेरबंद, अवैध दारू माफियांमध्ये खळबळ

पान 1 वरून ->

व गावठी दारू तसेच ४५ लिटर ताडी जप्त करण्यात आली. याशिवाय मानवी आरोग्यास गंभीर धोका निर्माण करणारे आणि अवैध दारू निर्मितीसाठी वापरले जाणारे ३,०७० लिटर रसायन जप्त करून घटनास्थळीच नष्ट करण्यात आले. त्यामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

लाखोंचा मुद्देमाल जप्त : या धडक मोहिमेत विभागाने एकूण ३ लाख ८५ हजार १५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये मद्यसाठा, रसायने, वाहने आणि इतर साहित्याचा समावेश आहे. 'एफ' विभागातील कारवाईत ९० हजार रुपये किमतीची दुचाकी जप्त करण्यात आली असून अवैध मद्य वाहतुकीसाठी वापरण्यात येणाऱ्या साधनांवरही विभागाची नजर आहे. विशेष म्हणजे, केवळ दारू जप्त करून कारवाई थांबविण्याऐवजी अवैध मद्यनिर्मितीच्या मुळावर घाव घालण्याची रणनीती विभागाने अवलंबली आहे. त्यामुळे दारू तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रसायनांचाही मोठ्या प्रमाणावर नायनाट करण्यात आला.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने स्पष्ट इशारा दिला आहे की, अवैध मद्य व्यवसायाची साखळी पूर्णपणे उद्ध्वस्त होईपर्यंत कारवाईचा हा धडाका कायम राहणार आहे. बेकायदेशीर दारू निर्मिती, वाहतूक अथवा विक्री करणाऱ्यांची कोणतीही गय केली जाणार नसून अशा प्रकारच्या माहितीबाबत नागरिकांनी पुढे येऊन विभागाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पुण्यातील घटनेनंतर सुरू झालेल्या या व्यापक मोहिमेमुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अवैध मद्य व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, आगामी काळात आणखी मोठ्या कारवायांची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हिंदू प्रकाश वार्ताच्या वृत्तानंतर प्रशासन खडबडून जागे...

पान 1 वरून ->

कर्मचारी वेळेत कार्यालयात उपस्थित राहिलेच पाहिजेत. वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर सर्व संबंधित कर्मचाऱ्यांना याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत." विभागातील काही कर्मचाऱ्यांना उशिरा येण्याची सवय लागल्याची बाबही त्यांनी अप्रत्यक्षपणे मान्य केली. मात्र यापुढे कार्यालयीन शिस्तीबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे संकेत त्यांनी दिले. बायोमेट्रिक प्रणाली कार्यान्वित झाल्यानंतर कर्मचारी उपस्थितीवर प्रभावी नियंत्रण राहील आणि वेळेचे पालन अधिक काटेकोरपणे होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, कार्यालयीन कामासाठी येणाऱ्या नागरिकांनी विभागाच्या या भूमिकेचे स्वागत केले असले तरी प्रत्यक्षात कर्मचारी वेळेत येण्यास सुरुवात होते का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अचानक तपासण्या करून कर्मचारी उपस्थितीची पडताळणी करावी तसेच नियमभंग करणाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे.

कडापे गावात जलजीवन नळपाणी योजनेचा शुभारंभ

हिंदू प्रकाश वार्ता , प्रतिनिधी

उरण / रायगड : रविवार दि. ३१/०५/२०२६ रोजी उरण तालुक्यातील कडापे गावात जलजीवन नळपाणी योजनेचा शुभारंभ आठगाव पाणीकमिटीचे नवनियुक्त अध्यक्ष व जि.प. सदस्य अविनाश ठाकूर, आठगाव पाणी कमिटीच्या माजी अध्यक्षा आणि वशेणी ग्रा.पं. सरपंच अनामिका म्हात्रे, आवरे ग्रा.पं. सरपंच निराबाई पाटील, हितेंद्र म्हात्रे आणि सर्व आठगाव पाणीकमिटी सदस्य यांच्या प्रयत्नांतून करण्यात आला.ह्यावेळी कडापे पाणीकमिटीचे अध्यक्ष संतोष म्हात्रे, सचिव सरिता प्रशांत म्हात्रे, पाणीकमिटीचे सदस्य, कडापे गावचे ग्रामस्थ आणि महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

अनेक वर्षांच्या प्रतिक्षे नंतर कडापे गावात नळपाणी योजनेचे पाणी आल्याने सर्व ग्रामस्थ व महिला भगिनींच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. ह्यावेळी कडापे ग्रामस्थांनी सर्व आठगाव पाणीकमिटीचे आभार मानले.तसेच कडापे पाणीपुरवठा कमिटीचे अध्यक्ष संतोष म्हात्रे आणि सर्व सदस्य तसचे कडापे गावातील महिला भगिनी यांच्या अथक प्रयत्नांने कडापे गावातील पाण्याचा गंभीर असलेला प्रश्न सोडविल्याने कडापे ग्रामस्थांच्या वतीने आभार मानत सर्वांचे अभिनंदन करण्यात करण्यात आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार कडापे गावातील आदर्श शिक्षक अशोक म्हात्रे यांनी केले.

'किस्सा शुरू टॉकीज'मुळे आता गावागावांत घरबसल्या पाहाता येणार नवीन चित्रपट

छत्रपती संभाजीनगर - ग्रामीण महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये आजही चित्रपटगृहांची सुविधा उपलब्ध नसल्याने नवीन चित्रपट पाहाण्यासाठी नागरिकांना शहरांवर अवलंबून राहावे लागते. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात ग्रामीण प्रेक्षकांपर्यंत थेट नवीन चित्रपट पोहोचवण्याच्या उद्देशाने 'किस्सा शुरू टॉकीज' हा नवा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाचे भव्य लोकार्पण नुकतेच मुंबईत पार पडले. महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते याचे अनावरण करण्यात आले, तर ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगांवकर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी सिनेसृष्टीतील दीपक तिजोरी, दिग्दर्शक अभिजीत पानसे, विजू माने, समीर विद्वांस, आशिष बेंडे, सुबोध खानोलकर, प्रिया बेर्डे, कुशल बद्रिके, संतोष जुवेकर, पुष्कर जोग, विशाखा सुभेदार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा शुभेच्छा संदेश सादर करण्यात आला. तसेच या सोहळ्यात 'किस्सा शुरू टॉकीज' चा विस्तार महाराष्ट्राबरोबरच कर्नाटक आणि गुजरात राज्यांमध्ये करण्याची घोषणाही करण्यात आली. 'किस्सा शुरू टॉकीज' होम सिनेमा हे एचडीएमआय आधारित आधुनिक उपकरण असून ते थेट टीव्हीला जोडता येते. या माध्यमातून ग्रामीण भागातील प्रेक्षकांना थिएटरमध्ये न जाता घरबसल्या नवीन चित्रपटांचा आनंद घेता येणार आहे. विशेष म्हणजे चित्रपट निर्माते आपले चित्रपट केएसटी प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करून देणार असून दर शुक्रवारी नवीन चित्रपट या डिव्हाईसमध्ये डाऊनलोड होणार आहेत. प्रेक्षकांना आपल्या पसंतीचा चित्रपट केवळ ९९ रुपये शुल्क भरून पाहाता येणार असल्याने ग्रामीण भागातील प्रेक्षकांसाठी हा एक परवडणारा आणि सोयीस्कर पर्याय ठरणार आहे.

या उपकरणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे केएसटीने विकसित केलेले दोन पेटंट-पेंडिंग तंत्रज्ञान. 'फॅमिली सेफ मोड', ज्याद्वारे कुटुंबाला सुरक्षित व वयानुरूप चित्रपट अनुभव नियंत्रित करता येईल आणि 'निर्माता-ते-थेट-प्रेक्षक व्हिडिओ कॉल' प्रणाली, ज्याद्वारे चित्रपट निर्माते व दिग्दर्शक थेट गावोगावच्या प्रेक्षकांशी संवाद साधू शकतात. चित्रपटांच्या सुरक्षेसाठी अत्याधुनिक डीआरएम व फॉरेन्सिक वॉटरमार्किंग तंत्रज्ञानाचाही यात समावेश आहे.

कार्यक्रमादरम्यान 'किस्सा शुरू टॉकीज' शी संलग्न होणाऱ्या पहिल्या चित्रपटाची घोषणा करण्यात आली. प्रसिद्ध दिग्दर्शक गजेंद्र अहिरे यांनी या नव्या माध्यमाबद्दल सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करत ग्रामीण प्रेक्षकांसाठी हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा असल्याचे सांगितले.

या उपक्रमामागील संकल्पना स्पष्ट करताना संस्थापक संतोष बिराजदार, अभिषेक जठार आणि शिरीष शिंदे यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील हजारो गावांमध्ये चित्रपटगृहे नसल्यामुळे ग्रामीण प्रेक्षक नव्या चित्रपटांपासून वंचित राहातात. हीच गरज ओळखून 'किस्सा शुरू टॉकीज' हा पर्याय निर्माण करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील प्रेक्षकांपर्यंत दर्जेदार मनोरंजन पोहोचवण्यासोबतच मराठी चित्रपटांना नवे व्यासपीठ उपलब्ध करून द्यायचे आहे."

महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार म्हणतात, "मराठी तरुणांनी एकत्र येत सुरू केलेल्या 'किस्सा शुरू टॉकीज होम सिनेमा' या उपक्रमामागची संकल्पना अत्यंत नाविन्यपूर्ण आणि काळाची गरज ओळखणारी आहे. 'आपल्या घरचा चित्रपट' ही भावना जपत, चित्रपट प्रदर्शित होतानाच तो गावागावांत आणि थेट घराघरांत पोहोचवण्याचा हा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे. विशेषतः मराठी चित्रपटाचे प्रेक्षक आणि प्रदर्शनाची व्याप्ती वाढवण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून राबवला जाणारा हा अभिनव प्रयोग मराठी चित्रपटसृष्टीसाठी महत्त्वाचा टप्पा ठरेल, असा मला विश्वास आहे.

पेण येथे रंगला सामाजिक आणि राजकीय मान्यवरांच्या उपस्थितीत दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

उरण / रायगड : पेण येथे दोन पुस्तकांच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. 'आभासात मी' या उरणचे सुपुत्र असलेल्या प्रा.एल. बी. पाटील लिखित पुस्तकासह 'रामदास - अखेरचा प्रवास' या गुंजार पाटील लिखित पुस्तकाचे प्रकाशन समारंभ दि. ३१ मे २०२६ रोजी आसरा फार्म, मु. वरवणे धनगरवाडी, पेण येथे संपन्न झाला .गुंजार पाटील यांचे १५ वे आणि एल. बी. पाटील(उरण)यांचे ३५ वे अशा दोघांच्या ५० व्या पुस्तकाचे प्रकाशन झाले . ही वाचक साहित्यप्रेमींना जणू पर्वणीच होती.या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांचीआणि प्रेक्षकांची मोठी उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सुप्रसिद्ध शिवव्याख्याते प्रा. प्रशांत देशमुख यांनी भूषविले . कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी संजय गुंजाळ-अध्यक्ष कोमसाप रायगड,कोकण गोवा महामार्गाचे गाढे अभ्यासक चैतन्य उषा लक्ष्मण पाटील, रायगड कोमसाप कार्याध्यक्ष पुरुषोत्तम मुळे- कोमसाप रायगड सचिव संजय होळकर , अंड गोपाळराव शेळके, महिलाध्यक्ष रायगड संध्या दीवकर,युवाध्यक्ष सिध्देश लखमदे ,गझलकारा ज्योत्स्ना राजपूत यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उद्घाटन संजय गुंजाळ यांच्या हस्ते झाले .तीन पुस्तकांचे प्रकाशन ज्येष्ठ कवी ए.डी.पाटील,चैतन्य उषा लक्ष्मण, आणि डॉ.राजेंद्र राठोड या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले .या वेळी रामदास बोट अपघातग्रस्त सुपुत्र श्रीरंग घरत,ज्येष्ठ साहित्यिक रोहिदास पोटे,डॉ. राजेंद्र राठोड-साहित्यिक दीपाली दिवेकर-अस्सी. कमिशनर, नवी मुंबई यांची भाषणे झाली

रायगडमधील गुणी जनांना सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये जीविता पाटील-ज्येष्ठ साहित्यिका, ज्येष्ठ कवी प्रवीण बोपुलकर, कवी डॉ.अमृत पाटील,कादंबरीकार गंज आनन म्हात्रे, कथाकार अजय शिवकर, साहित्य संपदाचे वैभव धनावडे , कवी गायक अनील भोईर,लवेंद्र मोकल इत्यादीचा सन्मानाने गौरव करण्यात आला.

लेखक आगरी साहित्य रत्न प्रा.एल.बी.मर,लेखक गुंजारव पाटील यांचे शिव व्याख्याते प्रशांत देशमुख यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आले.अतिशय विनोदी ढंगात गंधार पाटील पाटील यांनी प्रास्ताविक आणि आभार मानले.कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन सुप्रसिद्ध संचालिका दर्शना माळी आणि हेमंत बारटक्के यांनी करून दर्जेदार केला..

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

35 वर्षांची सेवा पूर्ण; 13 पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांना सजविलेल्या वाहनातून भावपूर्ण निरोप

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर, पोलीस दलातील सेवा ही केवळ नोकरी नसून समाजाच्या सुरक्षेसाठी दिलेले आयुष्य असते, याची प्रचिती सोमवारी पोलीस अधीक्षक कार्यालयात पाहायला मिळाली. तब्बल ३५ ते ३७ वर्षे अहोरात्र कर्तव्य बजावल्यानंतर छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलातील १३ अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या गौरवासाठी आयोजित विशेष समारंभात सन्मान, कृतज्ञता आणि भावनांचा अनोखा संगम पाहायला मिळाला.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा त्यांच्या कुटुंबीयांसह सत्कार करण्यात आला. सेवाकाळातील योगदानाची दखल घेत त्यांना सन्मानचिन्हे देण्यात आली.

'गणवेशातून निवृत्त, पण पोलीस कुटुंबातून नाही'

यावेळी मार्गदर्शन करताना पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव म्हणाले, "या अधिकाऱ्यांनी अनेक प्रतिकूल परिस्थितींना सामोरे जात समाजाच्या सुरक्षेसाठी अविरत सेवा दिली. सण-उत्सव, कौटुंबिक कार्यक्रम यांचा त्याग करून त्यांनी कर्तव्याला प्राधान्य दिले. त्यांचा अनुभव आणि शिस्त ही नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. ते आज सेवेतून निवृत्त होत असले तरी पोलीस दल हे त्यांचे कायमचे कुटुंब राहील."

तसेच सेवानिवृत्तीनंतर लाभांसाठी कोणालाही कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत, यासाठी सर्व निवृत्तीवेतन व इतर अनुज्ञेय लाभ सेवानिवृत्तीच्या दिवशीच वितरित करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. यामुळे सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त करत प्रशासनाचे आभार मानले.

सेवानिवृत्तीच्या दिवशीच सर्व लाभांचे वितरण

सरकारी कार्यालयांमध्ये निवृत्तीनंतर लाभांसाठी अनेकदा कर्मचाऱ्यांना वारंवार पाठपुरावा करावा लागतो. मात्र छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाने याला अपवाद ठरत सर्व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनासह इतर सर्व अनुज्ञेय लाभ सेवानिवृत्तीच्या दिवशीच वितरित केले. त्यामुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी प्रशासनाच्या तत्परतेबद्दल समाधान व्यक्त केले.

'आता बाबा प्रत्येक सणाला घरी असतील...'

कार्यक्रमातील सर्वात भावनिक क्षण म्हणजे सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या पाल्यांनी व्यक्त केलेल्या भावना. "वडिलांच्या कर्तव्यामुळे अनेक सण-उत्सव आम्हाला त्यांच्याविना साजरे करावे लागले. समाज सुरक्षित राहावा म्हणून त्यांनी कुटुंबापेक्षा कर्तव्याला महत्त्व दिले. आज ते कायमचे घरी परतत असल्याचा आम्हाला अभिमान आहे. आता प्रत्येक सण आम्ही एकत्र साजरा करू," असे मनोगत व्यक्त होताच उपस्थितांचे डोळे पाणावले.

फुलांनी सजविलेल्या वाहनातून घरपोच निरोप

समारंभाचा समारोपही तितकाच आगळावेगळा ठरला. पोलीस अधीक्षकांच्या संकल्पनेतून सर्व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या कुटुंबासह घरी पोहोचविण्यासाठी फुलांनी व शुभेच्छा फलकांनी सजविलेली विशेष वाहने उपलब्ध करून देण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत या वाहनांना हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ करण्यात आले. या अनोख्या सन्मानामुळे उपस्थितांमध्ये कौतुकाची भावना व्यक्त होत होती.

* सेवानिवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी*

पोलीस उपअधीक्षक शेषराव आबाजी उदार, रा.पो.नि. अण्णा खेलू वाघमोडे, पोउपनि दिलीप राधाकिसन चौरे, श्रेणी पोउपनि रज्जाक हुसेनभाई शेख, श्रेणी पोउपनि शिवाजी पुंजाराम दगडघाटे, श्रेणी पोउपनि गोविंद गणपत राऊत, पोउपनि दगडू बाळू तडवी, सफौ सुरेश किसन तायडे, सफौ शिवाजी अप्पाराव काळे, सफौ विष्णू भानुदास गायके, पोहेकॉ हरिकृष्ण लक्ष्मणराव मोरे, सफौ वसंत बालाजी कुलकर्णी व हेडकुक हुसेनखाँ सरदारखाँ पठाण.

या कार्यक्रमासाठी प्र. पोलीस उपअधीक्षक (गृह) संजय सहाणे, प्र. पोलीस उपअधीक्षक विनय सोनावणे, पोलीस निरीक्षक (कल्याण) आरती पवार, पोलीस निरीक्षक (एमटी) संतोष वायचळ, धनंजय फराटे तसेच इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

पुणे–पिंपरी चिंचवड विषारी दारू प्रकरणी शिवसेनेचे पथक करणार पाहणी

मुंबई / पुणे : पुणे व पिंपरी-चिंचवडमधील विषारी दारूमुळे मृत्यू झालेल्या प्रकरणी शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या आमदारांचे पथक मंगळवार, दि.02 रोजी रोजी जून पीडित कुटुंबीयांची भेट घेऊन घटनेची पाहणी करणार आहे.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार शिवसेना नेते आमदार अंबादास दानवे, शिवसेना उपनेते आमदार सचिन अहिर, आमदार सुनील शिंदे व आमदार बाबाजी काळे यांचे पथक सायंकाळी 05.30 वाजता हडपसर येथे पीडित कुटुंबीयांची भेट घेणार आहे. त्यानंतर सायंकाळी 7.30 वाजता पुणे पोलीस आयुक्तांची तर रात्री 8.30 वाजता पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तांची भेट घेऊन तपास व कारवाईची माहिती घेणार आहे. सदरील विषारी दारू पिल्यामुळे आतापर्यंत 18 जणांचा मृत्यू झाला असून यासाठी संपूर्ण राज्य सरकार व पोलीस यंत्रणा जबाबदार असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच पीडित कुटुंबीयांना न्याय देण्यात यावा, अशी मागणी पथकाकडून करण्यात येणार आहे.

जून महिन्यातील विभागीय लोकशाही दिन रद्द

छत्रपती संभाजीनगर, दि. ०१ : महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांचा निवडणुक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यानुसार निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. या पार्श्वभूमीवर विभागस्तरावरील जून-२०२६ मधील दुसऱ्या सोमवारी 08 जून २०२६ रोजी होणारा विभागीय लोकशाही दिन आयोजित केला जाणार नसल्याचे विभागीय आयुक्त कार्यालयाने कळविले आहे. सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहनही आयुक्त कार्यालयाने केले आहे.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी हा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो, परंतु आचारसंहितेमुळे या वेळी तो स्थगित करण्यात आला आहे.

अतिक्रमणधारकाची 'दबंगगिरी'; नगरसेवकाला जीवे मारण्याची धमकी

कायदा-सुव्यवस्थेचे तीनतेरा!

छत्रपती संभाजीनगर : शिवछत्रपतींच्या या भूमीत आता थेट लोकप्रतिनिधींनाच जिवंत मारण्याच्या आणि त्यांचे तुकडे करण्याच्या धमक्या देण्यापर्यंत गुंडांची मजल गेली आहे. शहरातील ऐतिहासिक शाहगंज परिसरात महापालिकेच्या अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान शिवसेनेचे नगरसेवक ऋषिकेश जैस्वाल यांना एका मग्रूर अतिक्रमणधारकाने "गोळ्या घालून तुकडे करू" अशी जाहीर धमकी दिल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. या घटनेचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर वाऱ्यासारखा व्हायरल झाला असून, या पुरोगामी महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्था शिल्लक राहिली आहे की नाही? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. महापालिकेच्या सभागृहात जनतेचे प्रश्न मांडले म्हणून जर लोकप्रतिनिधींवर अशा पद्धतीने हल्ल्याची भाषा केली जात असेल, तर सर्वसामान्यांचे काय? असा उद्वेग या घटनेमुळे व्यक्त होत आहे. प्रभाग क्रमांक १५ मधील वाढत्या अतिक्रमणाचा आणि नागरिकांना होणाऱ्या त्रासाचा मुद्दा ऋषिकेश जैस्वाल यांनी महापालिकेच्या सभागृहात अत्यंत आक्रमकपणे मांडला होता. जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी उठवलेला हाच आवाज त्या मग्रूर हातगाडी चालकाच्या जिव्हारी लागला. शाहगंज परिसरात जेव्हा महापालिकेचे पथक रस्ते मोकळे करण्यासाठी आणि अतिक्रमण हटवण्यासाठी पोहोचले, तेव्हा या कारवाईचा राग मनात धरून संबंधित अतिक्रमणधारकाने थेट जैस्वाल यांनाच लक्ष केले. महापालिकेच्या पथकासमोरच या गुंडाने शिवीगाळ करत कारवाईत अडथळा तर आणलाच, पण "तुला गोळी मारू, तुझे तुकडे करू" अशी थेट दहशतवादी भाषा वापरली. शासकीय कर्मचाऱ्यांसमोर लोकप्रतिनिधीला जाहीरपणे धमकी दिली जात असताना पोलीस आणि मनपा प्रशासन काय करत होते? असा रोखठोक सवाल आता उपस्थित केला जात आहे. छत्रपती संभाजीनगर हे शहर शांतताप्रिय आणि कायद्याचा आदर करणारे शहर म्हणून ओळखले जाते. मात्र, गेल्या काही दिवसांत शहरात अशा भाईगिरी आणि गुंडगिरीच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. भररस्त्यात महापालिकेच्या कारवाईला आव्हान देणे आणि लोकप्रतिनिधीला कापून काढण्याची धमकी देणे, हा सरळ सरळ प्रशासनाच्या नाकावर टिच्चून केलेला कायद्याचा भंग आहे. या गंभीर प्रकारानंतर शहरातील शिवसैनिकांमध्ये आणि नागरिकांमध्ये प्रचंड संतापाची लाट उसळली आहे. "शिवसेनेच्या लोकप्रतिनिधींना अशा पोकळ धमक्या देणाऱ्यांची मस्ती कशी जिरवायची, हे शिवसैनिकांना चांगलेच ठाऊक आहे," अशी संतप्त प्रतिक्रिया स्थानिक कार्यकर्त्यांमधून उमटत आहे.

जनतेच्या हक्कासाठी लढणाऱ्या लोकप्रतिनिधीला जर शहरात असुरक्षित वाटत असेल, तर हे गृहखात्याचे अपयश मानले पाहिजे. आता पोलीस प्रशासन या गुंड प्रवृत्तीचा कणा कसा ठेचते आणि ऋषिकेश जैस्वाल यांना कसा न्याय मिळवून देते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र, अशा धमक्यांपुढे शिवसेना ना कधी झुकली आहे, ना कधी झुकणार, हेच या निमित्ताने पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे!

आता तरी प्रशासन 'ॲक्शन मोड'वर येणार का?

या संपूर्ण प्रकरणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर आता शहरातील सुज्ञ नागरिकांचे डोळे पोलीस आयुक्त आणि महापालिका प्रशासनाच्या भूमिकेकडे लागले आहेत.

शासकीय कामात अडथळा आणणाऱ्या आणि लोकप्रतिनिधीला जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या त्या मग्रूर गुंडाला पोलीस कधी बेड्या ठोकणार?

शाहगंज परिसरातील ही गुंडगिरी मोडून काढण्यासाठी मनपा प्रशासन ती अतिक्रमणे पूर्णपणे जमीनदोस्त करणार का?

मोरावे येथील मुरबा गणपती मंदिराचा वर्धापनदिन भक्तिभावाने साजरा

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

उरण / रायगड : मोरावे गाव येथील समुद्रात असलेल्या प्रसिद्ध श्री गणपती मंदिराचा वर्धापनदिन सोमवारी (ता. १) मोठ्या उत्साहाने आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. सकाळच्या वेळेत गणेशपूजन आणि अभिषेक करण्यात आला. यावेळी गव्हाण-कोपर येथील श्री गुरुकृपा भजन मंडळाच्या गायिका सुप्रिया घरत-ठाकूर यांनी गणेशावर आधारित सुमधुर भजने सादर केली. त्यांना त्यांच्या सहकारी वादकांनी उत्तम साथ दिली. मुरबा गणपती ट्रस्टींनी आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधले होते; परंतु ते आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी जिनिव्हा येथे असल्याने सहभागी होऊ शकले नाहीत. त्यांच्या वतीने एम. जी. ग्रुपचे पदाधिकारी उपस्थित होते. महेंद्रशेठ घरत हे गणेशाचे निस्सीम भक्त असल्याने त्यांनी गणेशभक्तांचा समुद्रातील प्रवास सुखरूप व्हावा म्हणून १५ लाखांच्या दोन पॅसेंजर बोटी मुरबा गणपती देवस्थानला दान केल्या आहेत. त्यामुळे गणेशभक्त अतिशय आनंदाने पॅसेंजर बोटीतून प्रवास करून गणेशाचे दर्शन घेतात, फ्लेमिंगोंचा आनंद घेतात. सध्या कडक उन्हाळ्यामुळे सूर्य आग ओकत असतानाही छप्पर असणाऱ्या पॅसेंजर बोटींमुळे भक्तांचा प्रवास आनंदमयी झाला. त्यामुळे गणेशभक्तांनी महेंद्रशेठ घरत यांचे आभारही मानले. मुरबा गणपती देवस्थानचे ट्रस्टी शरद म्हात्रे, हेमंत पाटील, तेजस म्हात्रे, रितेश म्हात्रे यांनी वर्धापन दिनानिमित्त गणेशभक्तांची जय्यत तयारी केली होती.

जागतिक दूध दिनानिमित्त कार्यशाळा; पशुधनाचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचविण्याची गरज

काळाची पावले ओळखून पशुधनाचे महत्त्व पटवून द्या : वासुदेव सोळंके

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जागतिक दूध दिनानिमित्त पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयोजित एकदिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी, बदलत्या काळाची गरज ओळखून पशुधनाचे महत्त्व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

सोळंके म्हणाले की, राज्य शासनाने पशुसंवर्धन विभागाला कृषीसमकक्ष दर्जा दिला असून पशुपालन क्षेत्राला नवसंजीवनी मिळाली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर प्रति व्यक्ती सुमारे ४५० ग्रॅम दूधाची गरज असून ती किमान ७५० ग्रॅमपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवणे आवश्यक आहे. मात्र, सध्या दूध उत्पादन त्या प्रमाणात होत नसल्याने उत्पादनवाढीसाठी प्रभावी

उपाययोजना राबविण्याची गरज आहे. दूध उत्पादनात वाढ झाल्यास पशुपालकांच्या आर्थिक उत्पन्नातही भर पडेल, असे त्यांनी सांगितले.

प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे डॉ. पुंडलिक बोरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यशाळेची सुरुवात प्रस्ताविकाने झाली. यावेळी सहाय्यक आयुक्त डॉ. असरार अहमद यांनी जागतिक दूध दिनाचे महत्त्व, दूध उत्पादनवाढ आणि कृत्रिम रेतनाच्या माध्यमातून पशुधन विकासासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. पुंडलिक बोरकर यांनी जिल्ह्यातील दूध उत्पादन वाढीसाठी कृत्रिम रेतन तंत्रज्ञांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. शास्त्रशुद्ध कृत्रिम रेतनाद्वारे दर्जेदार पशुधन निर्मिती करून दूध उत्पादन वाढविण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच जिल्हाभर पशुपालक मेळावे आयोजित करून जनजागृती करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमास डॉ. रमन इंगळे, सहआयुक्त (नियोजन), डॉ. नानासाहेब कदम, जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर, डॉ. एम. जे. तळेकर, डॉ. गजानन चव्हाण यांच्यासह विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि कृत्रिम रेतन तंत्रज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. ज्ञानेश्वर बिडाईत यांनी उपस्थितांचे आभार मानले. जागतिक दूध दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यशाळेत दूध उत्पादनवाढ, पशुधन संवर्धन आणि पशुपालकांच्या आर्थिक सक्षमीकरणावर विशेष भर देण्यात आला.

वादळी वाऱ्याने सोलर पंपाचे नुकसान; शेतकऱ्यांची तातडीच्या भरपाईची मागणी

वैजापूर तालुक्यातील भगूर येथे आलेल्या वादळी वाऱ्याचा फटका

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर, : रविवारी दुपारनंतर जिल्ह्यात झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा फटका वैजापूर तालुक्यातील भगूर गावातील एका शेतकऱ्याला बसला. वादळी वाऱ्याच्या तडाख्यात झाडाची मोठी फांदी सोलर पॅनलवर कोसळल्याने सोलर पंपाचे मोठे नुकसान झाले आहे.

भगूर येथील गट क्रमांक ७७ मधील शेतजमिनीच्या मालक सरस्वतीबाई पंडितराव चव्हाण यांच्या शेतातील सोलर पंप प्रणालीचे नुकसान झाले. या सोलर पंपाच्या माध्यमातून शेतीसाठी पाणीपुरवठा केला जात होता. मात्र अचानक

आलेल्या वादळी वाऱ्यामुळे झाडाची मोठी फांदी पॅनलवर पडल्याने सोलर पॅनल तुटून संपूर्ण यंत्रणा बाधित झाली आहे.

अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि नैसर्गिक आपत्तींचा फटका शेतकऱ्यांना सातत्याने बसत असून त्यामुळे आर्थिक अडचणी वाढत आहेत. एकीकडे शेतीमालाला अपेक्षित भाव मिळत नसताना दुसरीकडे नैसर्गिक संकटांमुळे होणारे नुकसान शेतकऱ्यांच्या चिंतेत भर घालत आहे.

"आम्ही सामान्य शेतकरी आहोत. सोलर पंपाचे झालेले नुकसान आमच्यासाठी मोठे असून त्याच्या दुरुस्तीसाठी मोठा खर्च येणार आहे. प्रशासनाने पंचनामा करून तातडीने आर्थिक मदत व नुकसानभरपाई द्यावी," अशी मागणी शेतकरी सरस्वतीबाई चव्हाण यांनी केली आहे.

मान्सूनपूर्व डेंग्यू-मलेरिया प्रतिबंधासाठी महापालिकेची शहरव्यापी धडक अबेट मोहीम सुरु

10 झोनमध्ये घरभेटी, कंटेनर सर्वेक्षण, अबेटिंग व जनजागृती उपक्रम; नागरिकांच्या सहभागाचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता, प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर, मान्सूनपूर्व काळात डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया तसेच इतर डासजन्य व जलजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आरोग्य मलेरिया विभागामार्फत रविवारपासून संपूर्ण शहरात झोननिहाय धडक अबेट मोहिमेला प्रारंभ करण्यात आला. डेंग्यू प्रतिबंधाची प्रतिज्ञा घेऊन सुरू करण्यात आलेली ही मोहीम शहरातील सर्व १० झोनमध्ये व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे.

महापौर समीर राजुरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, विरोधी पक्षनेते समीर साजिद, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, आयुक्त अमोल येडगे तसेच वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सभापती डॉ. सुनीता सोळुंके यांच्या निर्देशानुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला भामरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जीवशास्त्रवेत्ता व साथरोग अधिकारी डॉ. सय्यद सुमैय्या नाज यांच्या अधिपत्याखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला भामरे यांनी मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व कर्मचाऱ्यांनी समन्वयाने व जबाबदारीने काम करण्याचे आवाहन केले.

डासजन्य आजारांवर नियंत्रण मिळविण्यासाठी उत्कृष्ट कार्य करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तर डॉ. सुमैय्या नाज यांनी शहरातील अतिजोखीम भागांमध्ये सर्वेक्षण, स्रोत निर्मूलन आणि अबेटिंगची कार्यवाही प्रभावीपणे राबविण्याबाबत मार्गदर्शन केले.

मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य अधिकारी आणि एमपीडब्ल्यू कर्मचाऱ्यांची व्हिडिओ परिषदेद्वारे बैठक घेण्यात आली. तसेच आरोग्य निरीक्षक व क्षेत्रीय पर्यवेक्षकांची स्वतंत्र आढावा बैठक आयोजित करून डासजन्य व जलजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना आणि धडक अबेट मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत सविस्तर सूचना देण्यात आल्या.

मोहिमेदरम्यान आरोग्य विभागाची पथके घरभेटी, कंटेनर सर्वेक्षण, अबेट औषध टाकणे, ताप सर्वेक्षण, जनजागृती उपक्रम, माहितीपत्रकांचे वितरण आणि जनजागृतीपर स्टिकर्स लावण्याचे काम करणार आहेत. तसेच 'कोरडा दिवस' पाळण्याबाबत नागरिकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. पाण्याच्या टाक्या, कुलर, ड्रम, फुलदाण्या आणि इतर पाणी साठवणाऱ्या ठिकाणी डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेच्या नियोजन व अंमलबजावणीसाठी डॉ. आदित्य जोशी, मनीषा ठाकरे, दानिश सिद्दीकी, निखिल ठाकरे तसेच सर्व मलेरिया पर्यवेक्षक सक्रियपणे कार्यरत आहेत. नागरिकांच्या सक्रिय सहभागातून शहराला डेंग्यू, मलेरिया आणि इतर साथरोगांपासून सुरक्षित ठेवण्याचा महापालिकेचा संकल्प असल्याचे आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे.

नागरिकांनी घ्यावयाची काळजी

कुलरमधील पाणी आठवड्यातून किमान एकदा बदलावे.

- **फुलदाणी व मनी प्लांटमधील पाणी नियमित बदलावे.**
- **पाणी साठविण्याची भांडी आठवड्यातून एकदा स्वच्छ घासून कोरडी करावीत.**
- **पाण्याच्या टाक्या व ड्रम झाकून ठेवावेत.**
- **हौदातील पाणी बदलणे शक्य नसल्यास त्यामध्ये गप्पी मासे सोडावेत.**
- **पूर्ण बाह्यांचे व पूर्ण पाय झाकतील असे कपडे परिधान करावेत.**
- **घर व परिसर स्वच्छ ठेवून डासांची उत्पत्ती होणारी ठिकाणे नष्ट करावीत.**

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

सोयगाव बस आगारातील कृष्णा मिसाळ व अशोक गिते यांचा सत्कार

हिंदू प्रकाशवार्ता/ प्रतिनिधी

सोयगाव,दि.१ जून : सोयगाव एसटी बस आगारातील वाहतूक नियंत्रक कृष्णा मिसाळ,सोयगाव व चालक अशोक गिते (लोहारा) यांची एसटी महामंडळाच्या सेवेतून निवृत्त झाले.यानिमित्त रविवार रोजी त्यांचा सोयगाव बस आगाराच्या वतीने त्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.त्यानिमित्ताने सोयगाव शहरातील कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेच्या वतीने त्यांचा शाल,फुल गुच्छ व भेट घेऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.सोबत यावेळी कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेचे पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन योगेश बोखारे,संदिप सोहणी सह आदी उपस्थित होते.

सोयगाव एसटी महामंडळाचा 78 वा वर्धापन दिन उत्साहात साजरा ; प्रवाशांचे स्वागत

सोयगाव,दि.१ वार्ताहर : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा (MSRTC) ७८ वा वर्धापन दिन सोमवार रोजी सकाळी १० वाजता सोयगाव आगार व बसस्थानक पातळीवर अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.या निमित्ताने सकाळी सोयगाव बसस्थानकावरून सुटणाऱ्या बसच्या चालक-वाहकांचा आणि प्रवाशांचा सत्कार करून वर्धापन दिन सोहळ्याला सुरुवात करण्यात आली.आगार आणि बसस्थानकाची आकर्षक सजावटवर्धापन दिनाचे औचित्य साधून सोयगाव आगार व्यवस्थापनाच्या वतीने संपूर्ण बसस्थानक परिसर आणि मुख्य आगार आकर्षक रांगोळी व फुलांचे हार लावून सजवण्यात आले होते.आगारातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हस्ते एसटीच्या 'लालपरी'चे विधीवत पूजन करण्यात आले. यानंतर सकाळी प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे आणि लहान मुलांचे गुलाबपुष्प व पेढे देऊन स्वागत करण्यात आले.उत्कृष्ट कर्मचाऱ्यांचा गौरववर्षभरात कोणतीही दुर्घटना न करता सुरक्षित प्रवासी सेवा देणारे चालक, प्रवाशांशी सौजन्याने वागणारे वाहक आणि गाड्यांच्या देखभालीत मोलाचे योगदान देणारे यांत्रिक कर्मचारी यांचा आगार व्यवस्थापकांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.यावेळी सोयगाव आगाराचे आगार व्यवस्थापक,मनिष जवळेकर सहाय्यक वाहतूक निरिक्षक कैलास बागुल,वाहतुक नियंत्रक,वर्जन जाधव,अशोक तायडे,सतिश पाटील,विनोद जाधव,समाधान जाधव,निलेश पाटिल,वाहक अनुराधा महाले,चालक.अशोक क्षिरसागर शिपाई,मधुकर आमटे,प्रवाशी,चालक-वाहक,यांत्रिक विभागाचे कर्मचारी आणि मोठ्या संख्येने प्रवासी उपस्थित होते.

नामांतराला वर्षे उलटली, तरी फलकांवर 'औरंगाबाद'च कायम!

शासकीय कार्यालये आणि महानगरपालिकेच्या फलकांवर जुने नाव; प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये संभ्रम

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : राज्य शासनाने ऐतिहासिक निर्णय घेत शहराचे नाव अधिकृतपणे 'छत्रपती संभाजीनगर' असे घोषित केले. सर्वोच्च न्यायालयातील प्रक्रियेनंतर तसेच केंद्र शासनाच्या मंजुरीनंतर हे नामांतर अंतिम झाले. शासनाच्या सर्व अधिकृत कागदपत्रांमध्ये, प्रशासकीय व्यवहारांमध्ये, महसूल नोंदींमध्ये आणि विविध विभागांच्या पत्रव्यवहारात 'छत्रपती संभाजीनगर' या नावाचा वापर होत असताना प्रत्यक्षात शहरातील काही शासकीय कार्यालये, सार्वजनिक इमारती आणि महानगरपालिकेच्या फलकांवर मात्र आजही 'औरंगाबाद' हेच जुने नाव कायम असल्याचे दिसून येत आहे.

विशेष म्हणजे, शहराचे नामांतर होऊन बराच कालावधी लोटल्यानंतरही अनेक ठिकाणी जुने फलक हटविण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. काही कार्यालयांच्या प्रवेशद्वारांवर, सूचना फलकांवर तसेच महानगरपालिकेशी संबंधित नामफलकांवर 'औरंगाबाद' असा उल्लेख आजही स्पष्टपणे दिसत असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

नामांतराचा निर्णय केवळ कागदोपत्री न राहता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे अपेक्षित असते. शासन आदेशानंतर संबंधित विभागांनी आपल्या अखत्यारितील सर्व फलक, दिशादर्शक पाट्या, कार्यालयीन नोंदी, संकेतस्थळे आणि माहिती फलक अद्ययावत करणे आवश्यक असते. मात्र प्रत्यक्ष परिस्थिती पाहता काही विभागांनी या प्रक्रियेकडे गांभीर्याने लक्ष दिले नसल्याचे दिसत आहे.

महानगरपालिका ही शहराची प्रमुख स्थानिक स्वराज्य संस्था असताना तिच्याच काही फलकांवर जुने नाव कायम असल्याचे चित्र समोर येत आहे. त्यामुळे नागरिकांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. शहराचे अधिकृत नाव बदलल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्यामध्ये महानगरपालिकेने पुढाकार घेणे अपेक्षित असताना त्याच संस्थेच्या फलकांवर जुन्या नावाचा उल्लेख आढळणे हा प्रशासकीय विसंगतीचा प्रकार असल्याची चर्चा सुरू आहे.

नागरिकांच्या मते, नामांतराच्या निर्णयानंतर शहरातील सर्व शासकीय कार्यालयांना आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना आवश्यक सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार सर्व फलक बदलणे अपेक्षित होते. मात्र आजही अनेक ठिकाणी जुने नामफलक दिसत असल्याने संबंधित विभागांनी आदेशांची अंमलबजावणी कितपत केली, याबाबत प्रश्न निर्माण होत आहेत. काही ठिकाणी नवीन फलक बसविण्याऐवजी जुनेच फलक कायम ठेवण्यात आल्याचेही निदर्शनास येत आहे.

प्रशासनाच्या या दुर्लक्षामुळे बाहेरून येणारे पर्यटक, नागरिक तसेच विविध कामांसाठी येणाऱ्या लोकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ शकतो. एका बाजूला शासनाच्या कागदपत्रांमध्ये 'छत्रपती संभाजीनगर' असा उल्लेख असताना दुसऱ्या बाजूला शासकीय इमारतींवरील फलकांवर 'औरंगाबाद' असे नाव दिसत असल्याने प्रशासनातील समन्वयाच्या अभावाचे दर्शन घडत असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

शहरातील विविध सामाजिक संघटना आणि जागरूक नागरिकांनी आता या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यास सुरुवात केली आहे. महानगरपालिका आणि संबंधित विभागांनी तातडीने सर्व फलकांचे सर्वेक्षण करून जुन्या नावाचे फलक हटवावेत तसेच सर्वत्र 'छत्रपती संभाजीनगर' हे अधिकृत नाव वापरले जाईल याची खात्री करावी, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, नामांतराच्या अंमलबजावणीत झालेल्या विलंबासाठी जबाबदार कोण, फलक बदलण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली होती का, तसेच उर्वरित सर्व फलक कधीपर्यंत बदलले जाणार, याबाबत महानगरपालिका आणि संबंधित विभागांनी स्पष्टीकरण देण्याची गरज व्यक्त होत आहे.

नामांतर पूर्ण, अंमलबजावणी अपूर्ण?

शासनाने शहराचे नाव अधिकृतपणे 'छत्रपती संभाजीनगर' केले असले तरी काही शासकीय कार्यालये आणि महानगरपालिकेच्या फलकांवर अजूनही 'औरंगाबाद' हेच नाव कायम आहे. नामांतरानंतरही जुने फलक न बदलल्याने प्रशासनाच्या दुर्लक्षाचा मुद्दा ऐरणीवर आला असून सर्व फलक तातडीने बदलण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रशासनाने याबाबत स्पष्ट भूमिका घेऊन शहरातील सर्व शासकीय व सार्वजनिक ठिकाणी अधिकृत नावाची काटेकोर अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे

महाविकास आघाडीच्या उमेदवार देवयानी पाटील डोणगावकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीसाठी महाविकास आघाडीच्या उमेदवार म्हणून देवयानी कृष्णा पाटील डोणगावकर यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी एकत्रित बैठक घेत निवडणुकीच्या रणनीतीवर चर्चा केली. त्यानंतर देवयानी पाटील डोणगावकर यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे अर्ज सादर केला.

यावेळी महाविकास आघाडीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते चंद्रकांत खैरे, शिवसेना नेते अंबादास दानवे,खासदार डॉ. कल्याण काळे, उपनेते सुभाष पाटील, माजी आमदार चंद्रकांत दानवे, जिल्हाप्रमुख मनीष श्रीवास्तव, नवीन ओबेरॉय तसेच विविध घटक पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

अजिंठा घाटात दोन ट्रकांच्या अपघातामुळे सात तास वाहतूक ठप्प

शेख हक्कानी

फर्दापूर,: छत्रपती संभाजीनगर–जळगाव महामार्गावरील अजिंठा घाटात सोमवारी सकाळी झालेल्या दोन ट्रकांच्या अपघातामुळे तब्बल सात तास वाहतूक ठप्प झाली. या घटनेमुळे घाटातील दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून प्रवाशांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागला.

मिळालेल्या माहितीनुसार, एमएच-20 जीजे-4139 क्रमांकाचा ट्रक छत्रपती संभाजीनगरहून जळगावच्या दिशेने जात असताना तांत्रिक बिघाड झाल्याने अजिंठा घाटातील रस्त्यावर उभा होता. त्याचवेळी एमएच-51 सी-0991 क्रमांकाचा ट्रक घाटातून जात असताना त्याचे ब्रेक निकामी झाले. चालकाने प्रसंगावधान राखत इतर वाहनांना धडक होऊ नये यासाठी प्रयत्न केले. मात्र वाहनावरील नियंत्रण सुटल्याने त्या ट्रकची बिघाडग्रस्त ट्रकला जोरदार धडक बसली.

अपघातानंतर दोन्ही ट्रक रस्त्याच्या मध्यभागी अडकल्याने घाटातील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली. रस्त्यावर केवळ दुचाकी वाहने जाऊ शकतील एवढीच जागा शिल्लक राहिली होती. त्यामुळे घाटाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आणि वाहतूक तब्बल सात तास ठप्प राहिली.

दरम्यान, उन्हाचा वाढता तडाखा आणि उष्णतेमुळे अडकून पडलेल्या प्रवाशांचे हाल झाले. लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्णवाहिकांतील रुग्णांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. अनेक प्रवाशांनी वाहतूक सुरू होण्याची प्रतीक्षा न करता घाटातून पायी मार्गक्रमण केले. काही प्रवासी फर्दापूर येथे येऊन पाणी, चहा व अल्पोपहार करून पुढील प्रवासासाठी रवाना झाले.

अपघाताची माहिती मिळताच संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली. दुपारच्या सुमारास क्रेनच्या सहाय्याने दोन्ही अपघातग्रस्त ट्रक बाजूला करण्यात आले. त्यानंतर वाहतूक हळूहळू सुरू झाली. मात्र संपूर्ण वाहतूक सुरळीत होण्यासाठी दुपारी सुमारे तीन वाजेपर्यंत वेळ लागला.

या घटनेमुळे अजिंठा घाटातील वाहतूक व्यवस्थापनाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी वाहनचालक व प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

इद्रिस मुलतानी यांच्या पाठपुराव्याची माहिती नागरिकांना देताना गुलाबराव पाटील कोलते

सावळदबारा प्रतिनिधी : फर्दापूर -सावळदबारा सर्कल मधील मागील काही महिना पूर्वी भाजपचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी दिल्ली येथे जाऊन केंद्रीय मंत्री तसेच मुबंई येथे मंत्रालयात मंत्री याना सावळदबारा सह परिसरातील विविध विषयाचे मागणीचे निवेदन त्यांनी दिले असून त्याच्या पाठपुरावा ते करत आहे यांच्या प्रयत्नांची माहिती भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांनी दि. 1 जून रोजी नागरिकांना दिली

इद्रिस मुलतानी यांच्या प्रयत्नांमुळे फर्दापूर गावासाठी पाणीपुरवठा योजनेसाठी शासनाकडून ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

सावळदबारा, डाभा, घाणेगाव, मोलखेडा, रवळा, जवळा. जामठी. देव्हारी, महालब्धा, पिंपळवाडी, नांदा तांडा, नांदगाव आदी परिसरातील नागरिकांना माहिती देताना भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते होते

सावळदबारा येथील भाजपाचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांच्या संपर्क कार्यालय येथे सावळदबारा व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

फकीरराव भालेराव यांच्या अभिष्टचिंतन सोहळा विविध उपक्रम राबवून खुलताबाद येथे साजरा

हिंदू प्रकाश वार्ता

खुलताबाद प्रतिनिधी : .खुलताबाद तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे खुलताबाद तालुका अध्यक्ष फकीरराव भालेराव यांचा अभिष्टचिंतन सोहळा खुलताबाद पंचायत समिती येथे पंचायत समितीच्या सभापती सुनिता संजय खंडागळे यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करू पंचायत समिती व जिल्हा परिषद तहसील कार्यालय व ग्रामीण रुग्णालया. कृषी कार्यालय एमआरईजीएस घरकुल यासारख्या राबवल्या जाणाऱ्या केंद्र सरकारच्या व राज्य शासनाच्या विविध योजनेचा गाव पातळीवर आपल्या मार्फत पुढाकार घेऊन लाभार्थ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करणारे फकीरराव भालेराव यांचं कार्य प्रेरणादायी असून तालुक्यातील विविध सामाजिक कार्यक्रम धार्मिक शैक्षणिक व गोरगरिबांसाठी धावून जाणारा सर्वसामान्य कुटुंबातील खांडेपिंपळगाव तालुका खुलताबाद येथील फकीरराव भालेराव हे नाव ग्रामीण भागातील कुशल नेतृत्व म्हणून प्रेरणादायी आहे याप्रसंगी विचार मांडताना भालेराव यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चे केंद्रीय मंत्री राष्ट्रीय अध्यक्ष रामदासजी आठवले. प्रदेश उपाध्यक्ष बाबुरावजी कदम यांच्या नेतृत्वाखाली आपण प्रामाणिकपणे पक्षाचे काम करत असताना गोरगरीब १८ पगड जाती जमातीच्या सर्व लोकांना सोबत घेऊन काम करून न्याय देण्याची आपली भूमिका असून आपण हे काम यापुढे सर्वांना सोबत घेऊन चालू ठेव यासाठी महाराष्ट्र राज्याचे मंत्री अतुल ची सावे .छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे खासदार संदिपान भुमरे. गंगापूर खुलताबाद चे आमदार प्रशांत बंब सभापती सुनिता ताई खंडागळे पंचायत समिती सदस्य दिनेश अंभोरे भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे बद्री नाना वाकळे यांच्यासह अनेक मान्यवरांचे सहकार्य लाभत असल्याचे सांगितले

अभिष्टचिंतन गौरव सोहळा . सत्कार करताना देताना खुलताबाद पंचायत समितीच्या सभापती सौ सुनीता ताई खंडागळे संजू भाऊ खंडागळे . माजी सरपंच कृष्णा चव्हाण अण्णा जाधव माजी सरपंच राहुल चव्हाण रिपाई वेरूळ सर्कल प्रमुख मधुकर गायकवाड रिपाई बोरगाव सर्कल प्रमुख वाल्मीक ढिवर आदी मान्यवरांनी यावेळी उपस्थिती होती.

उरण येथे महिला काँग्रेसतर्फे महागाई विरोधात आंदोलन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

उरण विठ्ठल ममताबादे

केंद्रातील मोदी सरकारने पेट्रोल, डिझेल, गॅस सिलिंडर यांच्या किमती वाढवल्या आहेत. त्यामुळे महागाई गगनाला भिडली आहे. त्यामुळे सामान्य जनता भरडली जात आहे. त्यामुळे महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा संध्याताई सव्वालाखे यांच्या आदेशानुसार रायगड जिल्हा काँग्रेस महिला अध्यक्षा रेखा घरत यांच्या अध्यक्षतेखाली उरण तालुक्यातील फुंडे पेट्रोल पंपावर रविवारी (ता. ३१) आंदोलन करण्यात आले. यावेळी महिलांनी मोदी सरकारविरोधात तीव्र भावना व्यक्त केल्या.

सध्याचे भाजप सरकार विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळत आहे. नीट पेपर लिक झाल्याने विद्यार्थ्यांच्या भवितव्यावरच टांगती तलवार आहे. त्यामुळे भाजप सरकारचा निषेध करावा तेव्हढा थोडा आहे. आता तरी मोदी सरकारने पेट्रोल, डिझेल, गॅस सिलिंडर यांच्या किमती तातडीने कमी कराव्यात आणि जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणीही रायगड जिल्हा महिला काँग्रेसतर्फे यावेळी करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष रेखा घरत, योगसाधना पाटील, अश्रया शिवकर, निर्मला पाटील, सोनाली पाटील, मनीषा पाटील, प्रमिला पाटील, पार्वती पंडित, माला पाटील, वर्षा पाटील आदी महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

हिंगोलीत पोलिसांची शेतकऱ्याच्या वेशात जाऊन जुगार अड्ड्यावर टाकली धाड

पोलीस स्टेशन सेनगाव अंतर्गत हत्ता पाटी परिसरातील शेतशिवारात छापा; सहा जुगाऱ्यांना अटक; हजारोंचा मुद्देमाल जप्त

हिंगोली : जिल्ह्यातील अवैध धंदे चालकांवर पोलीस प्रशासनाकडून वेळोवेळी कठोर कारवाई करून गुन्हेगारांना सळो की पळो करून सोडले जात आहे. हिंगोलीचे पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांना मिळालेल्या एका गोपनीय माहितीच्या आधारे, पोलीस स्टेशन सेनगावच्या हद्दीत चालणाऱ्या एका मोठ्या जुगार अड्ड्यावर छापा टाकून यशस्वी कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईसाठी परीविक्षाधीन पोलीस उपाधीक्षक श्री मयूर रसाळ यांच्या विशेष पथकाला पाचारण करण्यात आले होते. हा जुगार अड्डा शेतशिवारामध्ये असल्याने पोलिसांना अत्यंत गुप्तपणे ही मोहीम राबवावी लागली.

सदरचा जुगार अड्डा पोलीस स्टेशन सेनगाव अंतर्गत येणाऱ्या हत्ता पाटी परिसरापासून काही अंतरावर असलेल्या शेतशिवारात सुरू होता. जुगाराची जागा मुख्य रस्त्यापासून आत आणि शेतात असल्याने पोलिसांची गाडी किंवा संशयास्पद हालचाल दिसल्यास जुगारी पळून जाण्याची शक्यता होती. हीच अडचण ओळखून पोलीस पथकाने अत्यंत हुशारीने शेतकऱ्याचा वेश परिधान केला. शेतकऱ्याच्या कपड्यांमध्ये गेलेल्या पोलीस पथकाने हत्ता पाटीपासून सुमारे एक किलोमीटर अंतरावरील शेतशिवारात अचानक छापा मारला. पोलिसांची ही फिल्मी स्टाईल धाड पाहून जुगार खेळणाऱ्यांची एकच पळापळ झाली, मात्र सतर्क पोलिसांनी घेराव घालून सर्वांना जागीच पकडले.

या छाप्यात पोलिसांनी घटनास्थळावरून एकूण सहा जुगाऱ्यांना रंगेहात ताब्यात घेतले आहे. यामध्ये पुंजाजी लोभाजी गडदे, ज्ञानबा कोंडूजी पादेर, अनिल कचरू साळवे, रवी गुलाब चव्हाण, भाऊराव रामराव पवार आणि त्यांच्या इतर साथीदारांचा समावेश आहे. हे सर्व आरोपी सेनगाव तालुक्यातील रहिवासी आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींच्या ताब्यातून पोलिसांनी बावन्न पत्ते, चार मोबाईल फोन, जुगाराचे इतर साहित्य आणि रोख रक्कम असा एकूण चोपन्न हजार सहाशे दहा रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोलीस स्टेशन सेनगाव येथे मटका जुगार आणि तिरट नावाचा जुगार खेळल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911